।।श्री ।।

# नैष्कर्म्यसिद्धी भावदर्शन

## लेखकाचे मनोगत

अपार जीवसृष्टीमध्ये माणूस हा वैशिष्ट्यपूर्ण जीव आहे. ईश्वराची तशी योजनाच असल्याचे ऐतरेयश्रुती सांगते(२-२-३). त्याला मिळालेल्या पाच ज्ञानेंद्रियांनी जे ज्ञान होते, त्या ज्ञानापलीकडील ज्ञानाचा विचार करून त्याचा वेध घेण्याची क्षमता त्याचेजवळ आहे. त्या क्षमतेचाही क्रमाने विकास करून घेऊन तिला अनेक आकृतिबंधही त्याने दिले आहेत. दिसणाऱ्या व कळणाऱ्या बाह्य सृष्टीबरोबरच स्वत:च्या अंतरंगाचाही त्याने खोल बुडी घेऊन शोध घेतला आहे. पृथ्वीवरील सर्व देशातील मानवांनी त्यांच्या त्यांच्या क्षमतेनुसार व भोवतालच्या परिस्थितीच्या संदर्भाने हा विचार केला आहे. (पहा - History of Religion and Dictionary of Religion) सूक्ष्म निरीक्षण, निरीक्षणाचे पृथक्करण, पृथक्करणातून निवड व निवडीनुसार सुस्थिर भूमिका असा हा प्रवास दिसतो. निवडीतील विविधतेमुळे व तिच्या आग्रहामुळे जगात अनेक वैचारिक व आचारसंबंधी विविधता निर्माण झाली. ह्या आग्रहाला अनेक वेळा जुलुमाचे व हिंसेचेही रूप प्राप्त झाले. येथेच विचाराचा दारुण पराभव झाल्याचे चित्र दिसत आहे. बाह्य आचार व अंतरंग विचार ह्यांत अहंकार, स्वार्थ, सत्तालोलुपता, हुकूमशाही, असहिष्णुता इत्यादि परस्परात बेमालूम मिसळलेल्या बाबी शिरल्याने आचार विचारांचा मूळ हेतूच अडगळीत पडतो. लाकडांच्या मोळीप्रमाणे सर्व मानवांना एकाच आचार विचारात जखडण्याचा अविचार होतो. 'नैष्कर्म्यसिद्धी' ह्या श्रीसुरेश्वराचार्यांच्या केवलाद्वैत सांगणाऱ्या ग्रंथामध्ये वैचारिक खंडन मंडन असले तरी त्यात शांकर अद्वैतमत, तर्क व अनुभव ही वैचारिक शस्त्रसामग्री वापरली आहे.

माणसाने जगातील सर्व पदार्थांची, काही पदार्थ मिळविण्यास योग्य (उपादेय) व काही टाकण्यास योग्य (हेय), अशी वाटणी केली आहे. ही वाटणी बऱ्याच वेळा बरीच वेगळी असली तरी जे अनुकूल ते मिळवावे व प्रतिकूल ते टाकावे हे मात्र सर्वत्र सारखे आहे. अनुकूल-प्रतिकूलातही सतत अदलाबदल होत राहते हे सर्वांच्याच अनुभवाचे आहे. ह्या पुढे जाऊन स्वत:च्या शाश्वत हिताचे आहे ते अनुकूल असून तात्कालिक हिताचे ते प्रतिकूल मानावे अशीही प्रवृत्ती होते. शाश्वत हित कशात किंवा कोठे आहे ह्या संबंधी बरेच विचारमंथन झाले असून वेदान्ततत्त्वज्ञानाचा तोच मुख्य किंवा एकमेव हेतू आहे. हे मंथन उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे इत्यादी वेदान्तग्रंथ, त्याला अनुकूल तर्काची जोड व अनेकांना त्यानुसार आलेली प्रत्यक्षानुभूती ह्यांच्या साह्याने केले गेले आहे. ह्यात अनुभूतीतील फरकामुळे वेदान्तग्रंथांचे अर्थ वेगळे वेगळे लावले गेले. त्या अर्थांनुसार तर्काचीही बरीच ओढाताण झाली. काही तत्त्वज्ञांनी वेदान्तशास्त्रच अमान्य करून त्यांच्या स्वतंत्र प्रणाली तयार केल्या. हे सर्व भारताच्या संदर्भानेच असून भारताबाहेरील जगात लहानमोठ्या फरकांच्या कित्येक तत्त्वप्रणाली मांडल्या गेल्या व त्यांनाही कमीजास्त लोकमान्यता मिळाली. ह्या परिस्थितीतही भारतातील तत्त्वज्ञानाची ओढ जगातील अनेक विचारवंतांना वाटते हे सत्य आहे. कोणत्याही प्रकारची लौकिकातील प्रलोभने किंवा दंडुकेशाही न वापरताही ही ओढ सतत टिकून आहे. भारतावर राज्य करणाऱ्या पाश्चात्य राज्यकर्त्यातील बऱ्याच प्रामाणिक विचारवंतांना त्या काळापासूनच वैदिक तत्त्वज्ञानाविषयी मोठेच कुतूहल होते. स्वामी विवेकानंदांमुळे त्या कुतूहलाला भरीव स्वरूप आले. वेदान्तशास्त्र शाश्वत व अशाश्वत हितांची चिकित्सापूर्वक व्याख्या करून, त्यांची व्यवस्थित मांडणी करून, सर्व पटवून देण्याचे मोठे कार्य करते. त्याचे ह्यातच सार्थक आहे. त्यानुसार अपरोक्ष अनुभव येताच ते शास्त्र निवृत्त होते.

'**हित नेणती कोणी। अवतार पांडुरंग नांव ठेविले ज्ञानीं।**' ह्या संत श्रीज्ञानदेवांच्या आरतीनुसार माणसाला त्याचे शाश्वत हित कळत

नाही. वेदान्तशास्त्रानुसार जीवन्मुक्ती किंवा फार तर क्रममुक्तीत ते आहे. मुक्ती हा शब्द बंधनसापेक्ष असून बंधने जीवाला असतात. ती बंधनेही सत्य नसून कल्पित असतात. ती जर सत्य असती तर सत्याच्या व्याख्येनुसार ती तिन्ही काळात अबाधित राहिल्यामुळे मोक्ष कधीच सिद्ध झाला नसता. कल्पित अविद्येमुळे कल्पित बंधने सत्य वाटून माणूस त्यांचे दु:ख भोगतो व स्वत:चे मूळचे सुखरूपत्व (आत्मसुख) गमावून बसतो. ह्या अविद्येच्या निवृत्तीलाच मोक्ष म्हणतात. परंतु मोक्ष हा ज्ञानाने उत्पन्न होणारा नसून अविद्या निवृत्तीने व तत्त्वज्ञानाने जणू सिद्ध होणारा आहे. जो आत्मा हे 'मी'चे मूळचे स्वरूप आहे, तो नित्यसिद्ध, नित्यप्राप्त, अनादि, आद्य, सत्य, अखंड, भेदशून्य (भेदरहित), प्रत्यक्षरूप व जन्मादि विकाररहित आहे. त्याचप्रमाणे आत्मरूप मी सत्, चित् व आनंदरूप आहे. आत्मा व ब्रह्म एक आहेत. ब्रह्म निर्विकार असल्याने त्याला भयाचा व अपूर्णतेचा स्पर्शही नाही. त्याहून वेगळे, श्रेष्ठ, सूक्ष्म व त्यापलीकडे काही नाही. श्रुती, स्मृती व व्याससूत्रे हे स्पष्टपणे सांगतात. ही शास्त्रे असेही सांगतात की जीवाला 'मी ब्रह्म' असा दृढ, अपरिवर्तनीय व अपरोक्ष अनुभव आल्यावर शोक, पापपुण्य, जन्ममरण इत्यादी काहीच नसतात. आत्मरूप मी कोणाच्या आश्रयाने राहात नाही व कोणाला आश्रय देतही नाही. माझा कोणाशी संबंध नाही व कोणाचा माझ्याशी संबंध नाही. द्वंद्व व त्रिपुटीतून आत्मरूप मी पूर्णपणे मुक्त आहे. वेदान्तशास्त्र हे सर्व विषय पुढीलप्रमाणे सांगते –

१) **ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति।** (मुंडक ३-२-९)

२) **ब्रह्मविद् आप्नोति परम्।** (तै. २-१)

३) **निरञ्जन: परमं साम्यमुपैति।** (मुं. ३-१-३)

४) **तरति शोकमात्मवित्।** (छां. ७-१-३)

५) **य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति।** (श्वे. ३-१)

६) **तमेवविद्वान् न विकास मृत्यो:।** (अथर्व १०-५/४४)

७) **क्षीयन्ते चास्य कर्माणि --।** (मुं.२-२-९)

८) **हास्य सर्वेपाप्मान: प्रदूयन्ते।** (छां.५-२४-३)

९) **सा काष्ठा सा परागति:।** (कठ १-३-११)

१०) **भिद्यन्ते हृदयग्रन्थि: छिद्यन्ते सर्व संशया:।** (मुं. २-२-८)

११) **तन्निष्ठस्य मोक्षोपदेशात्** (ब्र. सू.६५)

१२) **यत् गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।** (गीता १५-६)

जन्माला येण्याचे कर्म व मरण पावण्याचे कर्म ह्या दोन टोकांच्या कर्मात माणसाचे कर्मजीवन चक्राकार गतीने चालू राहते. मोक्षानंतरच ह्यातून सुटका होते. जीवभाव धरून राहणाऱ्या माणसाची कर्मापासून कधीच सुटका होत नाही असे भगवद्गीता स्पष्टपणे सांगते - '**न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठति अकर्मकृत्**'(भ.गी. ३-५). 'मी जीव आहे' ह्या भ्रमातून मी कर्ता, मी भोक्ता, माझे कर्तव्य, माझे पापपुण्य, मला मिळणारी गती, श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व, व्यावहारिक कृतकृत्यता, सफलता-विफलता इत्यादि अनेक भाव तयार होतात. कर्मामध्ये रमलेल्या व रंगलेल्या माणसाला कर्मच शाश्वत हितकारक आहे असा दुराग्रही भ्रम होतो. धर्म, कर्तव्य, प्रेम, व्यवसाय, समाज, राष्ट्र, कला, क्रीडा, वाङ्मय, विज्ञान, इतिहास, भूगोल, पर्यटन, भोजन इत्यादींनी त्याचे जीवन व्यापून गेलेले असते. आरोग्य, शिक्षण, निवारा इत्यादी त्याच्या जिव्हाळ्याचे विषय असतात. ह्या सर्वांनी मानवी जीवन व्यापलेले असते हे पूर्णपणे खरे असले तरी ह्यातील कोणतीच बाब शाश्वत हिताची नाही हेही तेवढेच खरे आहे. ह्या सर्व बाबी सुखदु:खात्मक द्वंद्वांनी भरलेल्या आहेत हा सर्वांचाच अनुभव आहे. ह्या सर्वांसाठी कर्म करावे लागते. मोक्षरूप आत्मा 'अकृत' म्हणजे केलेला नसून तो अनादि, नित्य व सत्यत्वाने सतत आहेच आहे. जे केलेले व कळणारे आहे ते नष्ट होणारे म्हणजे अशाश्वत आहे. अधृव म्हणजे विनाशशीलाने धृवाची म्हणजे अविनाशित्वाची प्राप्ती होत नाही असे काठक श्रुती सांगते. कर्म हे जीवाकडून केले जाणारे आहे व म्हणून त्याचे फळ विनाशी आहे हे स्पष्ट दिसते. 'नैष्कर्म्यसिद्धि:' हे ग्रंथाचे नाव दोन प्रकारांनी मार्मिक आहे. नैष्कर्म्य म्हणजे कर्मापासून निर्गत म्हणजे दूर

असलेले असा अर्थ होतो. कर्माने मोक्षसिद्धी लाभत नाही हा त्या शब्दाचा मुख्य अर्थ आहे. मोक्षसिद्धीनंतर होणाऱ्या कर्माचा लेप किंवा बंध होत नाही हा नैष्कर्म्यसिद्धीचा दुसरा अर्थ होतो.

कर्माने मोक्ष नाही -

**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।**
**नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ।।** गीता १८-४९।।

**तुका म्हणे आम्हा कळले त्याचे वर्म। जें जें कर्मधर्म नाशिवन्त ।।** गाथा -१

मोक्षानंतर कर्मबंध नाही -

**यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ।।** गीता ४-१९।।
**संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघा झाला नारायण ।** आणि
**तुका म्हणे खावे प्यावे । जमाखर्च तुझ्या नांवें ।।**

नैष्कर्म्यसिद्धी ह्या ग्रंथामध्ये 'कर्माने मोक्ष नाही' ह्या सिद्धान्तावर सर्वस्वी भर दिला आहे. कर्माने मिळणारा स्वर्ग हाच मोक्ष असे मानणारे पूर्वमीमांसा दर्शनकार, वेदातील ज्ञानकांडाचा म्हणजे उपनिषदांचा कर्मपर अर्थ करून त्यांना गौण मानतात. असा विपरीत अर्थ करणाऱ्या कर्मठांचे कुमारिल भट्ट व त्यांचे स्वतंत्रप्रज्ञ असलेले शिष्य मंडणमिश्र हे अग्रणी होते. मंडणमिश्रांची विद्वत्ता भयचकित करणारी होती. भगवान् श्रीमद् आद्य शंकराचार्यांना, कर्माचे योग्य ते मूल्य सांभाळून वेदातील ज्ञानकांडाचे महत्त्व व अनिवार्यत्व जगाला समजावून सांगावयाचे होते. तेच त्यांच्या अवताराचे उद्दिष्ट होते. त्यासाठी ह्या गुरुशिष्याच्या महान जोडीला शास्त्रार्थ करून त्यात जिंकणे आवश्यक होते. कुमारिल भट्टांनी तृषाग्निसेवन करून आत्मसमर्पण करितांना मंडणमिश्रांचा पराभव करण्यास आचार्यांना सुचविले. त्याप्रमाणे भ. शंकराचार्यांनी मंडणमिश्रांना त्यांच्या विद्वान पत्नीसह प्रदीर्घ काळ चाललेल्या शास्त्रार्थात पराभूत केले. शंकरदिग्विजय ग्रंथात ह्या वादाचा काही तपशील उपलब्ध आहे. हा वाद मोठा अटीतटीचा होऊन त्यांत

हारताच मंडणमिश्रांनी संन्यासाश्रम स्वीकारून आचार्यांचे शिष्यत्व स्वीकारले व वादापूर्वी स्वीकारलेली अट पूर्ण केली. आचार्यांनी मंडणमिश्रांच्या आश्रमांतरानंतर त्यांचे 'सुरेश्वराचार्य' असे नांव ठेवून त्यांना शृंगेरी मठाचे अधिपत्य दिले. 'विश्वरूप' ह्या तत्कालीन विद्वान पंडिताचेच नाव मंडणमिश्र होते असाही एक प्रवाद आहे, पण त्यांत तथ्य नाही. त्या 'विश्वरूपाला' सुरेश्वराचार्य नाव दिल्याचा उल्लेख मिळतो. पूर्वीच्या आचार्यांचे बाबतीत स्पष्ट चरित्रसामग्रीच्या अभावामुळे असे भेद होतात. मंडणमिश्रांचे सुरेश्वराचार्य झाल्यावर त्यांनी केलेला हा ग्रन्थ भ. शंकराचार्यांच्या अन्य प्रमुख शिष्यांना शंकास्पद वाटत होता. त्यांत कोठेतरी पूर्वीचे द्वैती मंडणमिश्र डोकावतीलच अशी त्यांची धारणा होती. पण प्रत्यक्षात भ. शंकराचार्यांनी ह्या ग्रंथाला पूर्ण मान्यता दिली. शृंगेरी मठात सुरेश्वराचार्यांची समाधी आहे. नैष्कर्म्यसिद्धीवर पाच टीकाग्रंथ उपलब्ध आहेत. १) भावदीपिका - चित्सुखाचार्य, २) चंद्रिका - ज्ञानोत्तम मिश्र, ३) विद्यासुरभि - ज्ञानामृत, ४) सारार्थ - रामदत्त, ५) क्लेशापहारिणी - स्वामी सच्चिदानन्देंद्र. शिवाय डॉ. बालासुब्रह्मण्यम् ह्यांनी चंद्रिकेचे इंग्रजी भाषांतर चैन्नई विश्वविद्यालयाचे विद्यमाने प्रसिद्ध केले आहे. ह्याचेच आचार्य चित्तनारायण पाठक ह्यांनी हिंदी भाषांतर केले आहे. पं. प्रेमवल्लभ त्रिपाठीशास्त्री ह्यांचीही हिंदी टीका असून पं. श्रीधरशास्त्री पाठक ह्यांचे त्रोटक मराठी भाषांतर उपलब्ध आहे.

नैष्कर्म्यसिद्धीसारख्या शास्त्रीय प्रकरणग्रंथावर लेखन करण्याचे साहस मला पंचदशीच्या लेखनाने दिले. भ. शंकराचार्यांचे बोट धरून वाटचाल करण्याचा प्रयत्न सोप्या भाषेत येथे केला आहे. वेळोवेळी संतांचा आधार आहेच. अधिकाधिक मुमुक्षुंची शास्त्रग्रंथांच्या अभ्यासाकडे प्रवृत्ती व्हावी हाही ह्या भाषांतराचा उद्देश आहे. स्वसंवेद्य व वस्तुतंत्र असलेल्या आत्मस्वरूपाचा 'तो मी' असा अनुभव घेण्याला प्रवृत्त करणारा शास्त्रग्रंथ जेवढ्या सोप्या भाषेत लिहिणे शक्य झाले तेवढ्या सोप्या भाषेत तो लिहिला आहे. शांकर अद्वैत वेदान्ताचे महत्त्वाचे प्राचीन ग्रंथ मराठीमध्ये

उपलब्ध व्हावे हीही ह्यामागे भूमिका आहे. ह्या ग्रंथाच्या नावाचीच दहशत वाटते हेही मी अनुभवले आहे. स्वसंवेद्य, वस्तुतंत्र इ. शास्त्रीय शब्दांचे स्पष्टीकरण जागोजागी होईलच. त्यांचे वर्म एकदा कळले की तेच शब्द हवेसे वाटू लागतात. त्यांचेपासून असलेला दुरावा दूर होतो. तत्त्वज्ञानाचा आस्वाद घेऊन अनुभवापर्यन्त मजल मारता येते. मोक्षशास्त्रातील अस्पष्टता, विस्कळितपणा, पसारा इत्यादि दोष दूर करण्याचे काम शास्त्रग्रंथ करितात. अनेक ग्रंथ, संप्रदाय, वक्ते, प्रसारमाध्यमांकडून होणारा उलटसुलट प्रचार, भावनात्मक आवाहने, लेख, सामाजिक कार्याची जोड, इत्यादिंमुळे प्रामाणिक साधकाला नेमके काय करावे हे समजणे कठीण होते. ह्या सर्वांचे सुटे भाग एकत्र करून मोक्षशास्त्राची आटोपशीर वास्तू बांधण्याचे काम वेदान्तशास्त्राच्या यथार्थ अभ्यासाशिवाय होत नाही. (लहान मुलांची खेळणी ह्या प्रकारचीही असतात.) मोक्षशास्त्र **SMART** असूनही तसे ते मांडले जात नाही. औद्योगिक क्षेत्रात हा शब्द प्रसिद्ध आहे. त्या प्रत्येक अक्षराचे स्पष्टीकरण असे -

१) **S = Specific** = नेमके, नेटके, स्पष्ट. परमार्थशास्त्राचे नेमके उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे -

**श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभि: ।**
**ब्रह्म सत्य जगन्मिथ्या जीवोब्रह्मैव ना पर: ।।**

केवळ अर्ध्या श्लोकात हे उद्दिष्ट मांडले आहे. भाराभर ग्रंथांचे ते सार आहे. ब्रह्मच फक्त सत्य आहे. अनेक प्रकारांनी ज्याचे ज्ञान होते ते जग मिथ्या आहे. जीव ब्रह्मरूप असून तो त्याहून वेगळा नाही.

२) **M = Measurable** = मोजण्यासारखे, परिणाम स्पष्ट कळण्यासारखे. गीतेमध्ये भक्त, ज्ञानी व योगी ह्यांची लक्षणे स्पष्टपणे सांगितली आहेत. '**संतुष्ट: सततं योगी**' (गी.१२-१४) इत्यादि.

३) **A = Achievable** = मिळविण्यासारखे, अनुभवण्यासारखे. आजपर्यन्त कित्येक महात्म्यांनी 'मी ब्रह्म' असा अनुभव घेऊन तो नोंदवून ठेविला आहे. '**ह्या नरदेहाचेनि संबंधें। बहुत पावले उत्तम पदे।**'(दा.१-१०-

१९) असे समर्थ स्पष्टपणे सांगतात.

४) **R = Reasonable** = विचाराला पटणारे, तर्काला टिकणारे. समाजाकडून यत्किंचित् अपेक्षा नसलेले, विरक्त व तृप्त संतसुद्धा जगाला परमार्थाचा उपदेश करतात. परमार्थाला सुखरूपतेचे फळ नसते तर सुखासाठी धडपडणाऱ्या माणसांच्या ह्या जगात परमार्थशास्त्र हजाराहून अधिक वर्षे जपले गेलेच नसते.

५) **T = Time bound** = काही कालमर्यादेमध्ये मोक्षलाभ होऊ शकतो. परीक्षितीला सात दिवस पुरले. खट्वांग राजाला काही घटकाच पुरेशा झाल्या. '**हेचि देहीं हेंचि डोळां। भोगू मुक्तीचा सोहळा।**' असे जगद्गुरू श्रीतुकोबाराय म्हणतात. 'मानवी देहप्राप्तीतच मोक्ष सिद्ध केला तर ठीक. नंतर विनाश आहे' असे केनश्रुती सांगते.

आवश्यक ती पूर्वतयारी (अधिकार) असलेल्या कोणालाही मोक्षलाभ होणे शक्य आहे. ग्रंथ, व्यक्ती, संप्रदाय, साधने, व्रतवैकल्ये, प्रवचने, कीर्तने, भजने, तीर्थक्षेत्रे इत्यादि सर्व गौण असून मोक्ष हाच ह्या सर्वांचा हेतू आहे. तो लाभत नसेल तर ह्या सर्वांना अवडंबराचे स्वरूप येऊ शकते. 'एक सात्त्विक मनोरंजन(फार तर)' एवढेच त्याचे मूल्य उरते. त्यांत गतानुगतिकता, यांत्रिकता व सकामता अलगद शिरते. सत्ता, संपत्ती, यश, कीर्ती व प्रतिष्ठा ही उद्दिष्टे त्यांत चोरपावलाने शिरतात. हे सर्व अडथळे व धोके टाळण्यासाठी अस्सल परमार्थशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास, मनन व चिंतन अनिवार्य आहे. श्रीज्ञानदेव व समर्थादि संत आत्मचर्चा करण्यास सांगतात. एकनाथ, तुकारामही अद्वैताचा पुरस्कार करतात. त्यांनी सगुणाचा घेतलेला आधार व त्याचा आग्रहसुद्धा अद्वैतानुभवासाठीच आहे. ह्या सर्व विचाराच्या आधाराने 'नैष्कर्म्यसिद्धी' सारख्या शास्त्रग्रंथांचे अध्ययन करावे असे भगवान श्रीमदाद्य शंकराचार्यही सांगतात. उदा. – 'आत्मानुभव ग्रंथामध्ये नसून हृदयात असतो' असे ते उपदेश– साहस्रीमध्ये म्हणतात हे तर प्रकर्षाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात कर्म हे मोक्षाचे प्रत्यक्ष साधन नसून त्याला सहकारी साधनाचा दर्जा देता येतो असे सांगितले आहे. सृष्टी अविद्यात्मक असून त्यांतील जीवाने त्यात केलेले कर्म अविद्याजन्य असल्याने, ज्ञानरूप मोक्षसिद्धीसाठी त्याचा थेट उपयोग होणे शक्य नाही. अशुद्ध अन्त:करण हा आत्मज्ञानासाठी असू शकणारा अडथळा (प्रतिबंध) दूर करण्याचे काम वेदानुसार केलेल्या निष्काम कर्माने होते. (भ. शंकराचार्य व ज्ञानदेवांसारख्यांना असा प्रतिबंध मुळातच नव्हता.) अविद्यानाश व आत्मज्ञान कर्माने प्रत्यक्षपणे होणे शक्य नाही. मोक्ष केवळ ज्ञानानेच होतो व तो ज्ञानरूप आहे.

'**तत्त्वमसि**' हे महावाक्य (छांदो.६-१६) दुसऱ्या अध्यायात विचारासाठी घेतले आहे. त्याच्या अर्थाच्या बोधाने अविद्या निवृत्त होऊन ज्ञान होते. त्या बोधामुळे आत्मा व अनात्मा ह्यांच्या स्वरूपाचा निश्चय होतो व अनात्म पदार्थांचे अनुसंधान सोडता येते. आत्म्यावरच अनात्म जगत् भासत असले तरी आत्मा त्याने जराही लिप्त होत नाही. आत्मा व अनात्मा ह्यांच्या संधीत 'अहं' चा खेळ चालतो. ही अहंवृत्ती बाधित होताच द्वैताचा बाध होऊन आत्माच फक्त उरतो. हे ज्ञान इतर कोणत्याही ज्ञानाने होत नसून केवळ श्रुतिवाक्याच्या यथार्थ बोधाने होते. ज्ञान झाल्यानंतर श्रुतीही निवृत्त होते.

तिसऱ्या अध्यायात श्रुतीतील महावाक्यांचा यथार्थ बोध कसा होतो ह्याचा विचार केला आहे. प्रत्यक्षादि प्रमाणे द्वैताचाही सर्व पसारा जाणू शकत नाहीत आणि आत्मस्वरूपाला तर त्यांना स्पर्शही करता येत नाही. महावाक्यातील वाच्यार्थाने सुद्धा आत्मबोध होत नाही. तो लक्ष्यार्थ चिंतनानेच होतो. तत् व त्वम् हे अन्तिमत: एकाच अधिकरणातील आहेत हे लक्षात घ्यावेच लागते. त्वम्ने सूचित होणारे द्वैत व तत् ने सूचित होणारी परोक्षता (दूरत्व) ह्यांचे विसर्जन व्हावे लागते. असे एकदा झाले की पुन्हा पुन्हा श्रवण, मनन व निदिध्यासन (प्रसंख्यान = उपासना, ध्यान) करावे लागत नाही.

चवथा अध्याय हा उजळणीचा व श्रीगुरूमाहात्म्याचा आणि शरणतेचा आहे. वास्तविक श्रुतीच्या वाक्यानेच नित्यसिद्ध आत्मानुभव येतो व त्यासाठी अन्य सहायक साधनांची गरज नाही हे खरे असले तरी श्रुतिवाक्यांचा यथार्थ बोध श्रीगुरूप्रसादाशिवाय होत नाही हे तेवढेच खरे आहे. शिवाय श्रुतींचे स्पष्टीकरण करणारी शास्त्रेही उपयुक्त आहेत. श्रीसुरेश्वराचार्यांच्या ह्या सांगण्याला पुष्टी देण्यासाठी त्यांनी श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या (त्यांचे श्रीगुरू) उपदेश साहस्रीमधील व गौडपादाचार्यांच्या मांडुक्य कारिकातील काही श्लोक उद्‌धृत केले आहेत. त्यामुळे त्यांची परंपरा स्पष्टपणे लक्षात येते व त्यांच्या केवलाद्वैतावरील निष्ठेसंबंधी सर्व शंका दूर होतात.

श्रीसुरेश्वराचार्यांनी केवलाद्वैतचिंतन करतांना स्वत:ची तुलना भगिरथाशी केली आहे. त्यासाठी त्यांनी नैष्कर्म्यसिद्धी ह्या स्वतंत्र ग्रंथाबरोबरच त्यांच्या श्रीगुरूंनी केलेल्या भाष्यांवर स्पष्टीकरणात्मक वार्तिकेही लिहिली. बृहदारण्यकभाष्य, तैत्तिरीयभाष्य, दक्षिणामूर्ती स्तोत्र, पंचीकरण हे ते वार्तिक ग्रंथ आहेत. श्रीशंकराचार्यांनी तोटकाचार्यादि अन्य तीन मुख्य शिष्यांबरोबर वाद केला नाही पण मंडणमिश्रांशी वाद करून त्यांना शिष्यत्व दिले एवढे त्यांचे माहात्म्य आहे. 'संक्षेपशारीरक' ह्या प्रसिद्ध वेदान्त ग्रंथाचे लेखक सर्वज्ञात्ममुनि हे सुरेश्वराचार्यांचे शिष्य आहेत. अशा ह्या ग्रंथाचे अध्ययन करून मुमुक्षूला अतीव समाधान होईल असा विश्वास वाटतो.

ज्यांना न्यायदर्शन, संस्कृत व व्याकरण ह्यांचे सांप्रदायिक पद्धतीने अध्ययन करण्याचे भाग्य लाभलेले नाही त्यांना नैष्कर्म्यसिद्धीसारखा वेदान्तग्रंथ समजावा ह्या दृष्टीने प्रयत्न केला आहे. माझे स्वत:चेही असे अध्ययन झालेले नसल्याने त्या ग्रंथांवरील भाष्यांचा उपयोग करूनच लेखन केले आहे. त्यामुळे सांप्रदायिक अध्ययन झालेल्यांना त्यात रुची वाटणार नाही हे उघड आहे. तरीही विचारसागररहस्य, पंचदशी, पं. द. वा. जोग ह्यांची ग्रंथसंपदा, आचार्यांची उपनिषद्‌भाष्ये ह्यांच्या साह्याने लेखन केले

असल्याने शुद्ध अद्वैत वेदान्ताला धक्का लागणार नाही ह्याची काळजी घेतली आहे. एवढे करून कोठे संदिग्धता राहिली असेल तर ती जाणकारांनी अवश्य लक्षात आणून द्यावी ही प्रार्थना.

ह्या ग्रंथाचे लेखन प्रवासात झाल्याने लेखनाला अनेकांनी अनेक प्रकारे मदत केली आहे, त्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. जकार्ताला कु. ऋचा संजीव दाढे, ऑकलंड (न्यूझीलंड) येथे श्री. वैभव नाईक, सौ. सुजाता नाईक व श्रीमती अलका देशपांडे आणि सिंगापूरला श्री. श्रीकांत जोशी, सौ. पद्मजा जोशी, कु. ऐश्वर्या दिलीप मेहेंदळे व कु. श्रीविद्या दिलीप मेहेंदळे (खार- मुंबई) ह्यांचे अनेक प्रकारे सहकार्य लाभले. त्यांच्यावर श्रींची कृपा होईलच.

माझे श्रीगुरू ब्रह्मसंस्थ श्रीशंकरमहाराज खंदारकर ह्यांच्या कृपेच्या वरदहस्तानेच ही लेखनसेवा झाली आहे.

श्री. द. देशमुख